# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : 3960 / ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : 22 FEB 2026

**:: परिपत्रक ::**

विषय : **अधिवेशन कालावधीत अधिकारी गॅलरीच्या वापराबाबत ...**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होत आहे. अधिवेशन कालावधीत महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात विधानमंडळ अधिकाऱ्यांसाठी असलेल्या गॅलरीत सभागृहात सुरु असलेल्या कामकाजाशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बसावे अशी अपेक्षा आहे. तथापि, सभागृहातील कामकाजाशी प्रत्यक्षात संबंध नसलेले कर्मचारी गॅलरीतील आसनांवर बसलेले वारंवार निदर्शनास आलेले आहे. परिणामी, विधानमंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना व कामकाजाशी संबंधित कर्मचाऱ्यांना जागे अभावी उभे रहावे लागते. हे लक्षात घेता निदेशानुसार असे कळविण्यात येत आहे की, फक्त सभागृहाच्या कामकाजाशी संबंध असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनीच सदरहू गॅलरीत बसावे. तसेच विधानमंडळातील वरिष्ठ अधिकारी गॅलरीत आल्यास त्यांना त्वरित जागा उपलब्ध करुन द्यावी.

विधानपरिषदेत व विधानसभेत मंत्रालयीन सचिवांसाठी राखून टेवलेल्या कक्षात कनिष्ठ दर्जाचे मंत्रालयीन अधिकारी उपस्थित राहतात व त्यामुळे त्या कक्षात गर्दी होते. काही वेळेला त्यात प्रवेश मिळणे फार अडचणीचे होते व त्यामुळे मा.मुख्यमंत्री/मंत्री महोदयांना काही वेळा महत्त्वाची माहिती लागल्यास, ती उपलब्ध करुन देण्यास अडचणी निर्माण होतात.

तरी यापुढे, सभागृहातील कामकाजाशी संबंध नसणारे कर्मचारी उक्त गॅलऱ्यांमध्ये बसल्याचे आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(रविंद्र जगदाळे)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

**(१) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी.**
**(२) मा.सभापती, मा.अध्यक्ष, मा.उप सभापती, मा.उपाध्यक्ष, यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी.**
**(३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.**
**(४) मुख्य सुरक्षा अधिकारी, विधान भवन, मुंबई.**

... यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

E:\g१ backup\BUDGET SESSION २०२६\letter starting\paripatrak.doc